**मेसर्स राझा मेटल्स मॅगनीज प्रोसेसिंग अँड ट्रेडींग, भुखंड क्र. बी-६, एम.आय.डी.सी. एरीया, ता. पारशिवनी, जि. नागपुर (१५० मॅट्रिक टन/प्रति महिना मॅगनीज डायऑक्साइड (MnO२) च्या विदयमान उत्पादनव्यतिरीक्त ३५० मेट्रिक टन/प्रति महिना मॅगनीज डायऑक्साईड चे उत्पादन आणि १००० मेट्रिक टन प्रती महिना मॅगनीज ऑक्साइड (MnO) चे उत्पादन करुन सध्याच्या प्रक्रिया उदयोग समूहाचा विस्ताराचा प्रस्ताव ठेवला आहे. त्यामुळे एकुण उत्पादन क्षमता १५०० मेट्रिक टन/प्रति महिना) यांची प्रस्तावित मॅगनीज खनिज गुणवत्ता सुधारणा प्रकल्पाचा विस्तार घेण्यासाठी प्रस्तावित प्रकल्पासंदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत....**

---

मेसर्स राझा मेटल्स मॅगनीज प्रोसेसिंग अँड ट्रेडींग, भुखंड क्र. बी-६, एम.आय.डी.सी. एरीया, ता. पारशिवनी, जि. नागपुर (१५० मॅट्रिक टन/प्रति महिना मॅगनीज डायऑक्साइड (MnO२) च्या विदयमान उत्पादनव्यतिरीक्त ३५० मेट्रिक टन/प्रति महिना मॅगनीज डायऑक्साईड चे उत्पादन आणि १००० मेट्रिक टन प्रती महिना मॅगनीज ऑक्साइड (MnO) चे उत्पादन करुन सध्याच्या प्रक्रिया उदयोग समूहाचा विस्ताराचा प्रस्ताव ठेवला आहे. त्यामुळे एकुण उत्पादन क्षमता १५०० मेट्रिक टन/प्रति महिना) यांची प्रस्तावित मॅगनीज खनिज गुणवत्ता सुधारणा प्रकल्पाचा विस्तार घेण्यासाठी प्रस्तावित प्रकल्पासंदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दि. २६ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मौजा- प्रकल्पाचे स्थळ, बी-६, एम.आय.डी.सी. एरीया, ता. पारशिवनी, जि. नागपुर येथे संपन्न झाली.

पर्यावरण आघात मुल्यांकन, अधिसुचना दि. १४ सप्टेंबर २००६ व २००६ च्या अधिनियमान्वये व सुधारीत अधिनियम दि ०१ डिसेंबर २००९ च्या तरतुदीनुसार जाहिर लोकसुनावणीचे स्थळ, दिंनाक व वेळ, मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांची मंजुरी घेऊन निश्चित करण्यात आली होती.

मंडळाचे मुख्यालयाने पत्र क्र. BO/JD(WPC)/PH/B-२४०४१९-FTS-०२४१ दि. १९/०४/२०२४ अन्वये सदर जाहिर लोकसुनावणी दि. २६/०४/२०२४ रोजी दुपारी ११.०० वाजता प्रकल्प स्थळी घेण्याबाबत कार्यालयीन आदेश जारी केला होता. **(सहपत्र-१)**

या प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीच्या सुचना मराठी वृत्तपत्र दैनिक सकाळ व इंग्रजी दैनिक वृत्तपत्र हितवाद मध्ये दि. २४ मार्च २०२४ रोजी प्रसिदध करण्यात आल्या. **(प्रत सोबत-२)**

पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीकरीता मा. प्रितेश महाजन, अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, नागपुर तथा अध्यक्ष, लोकसुनावणी समिती, श्री. संजय डी. पाटील, मा. प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, नागपुर तथा सदस्य लोकसुनावणी समिती, श्री. राजेंद्र उ पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र.नि. मंडळ, नागपुर तथा समन्वयक लोक सुनावणी समिती, ग्रामस्थ, सरपंच, पर्यावरण विषयक कार्यरत सेवाभावि संस्था,

चॅनलचे प्रतिनिधी, व मोठया संख्येने स्थानिक उपस्थित होते. या बाबतचे हजेरी पट सोबत जोडत आहे. **(सहपत्र क्रं ३)**

**कार्यपध्दती व उद्देश :**

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने सर्वप्रथम श्री. राजेंद्र उ. पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, नागपुर तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थित असलेले ग्रामस्थ, सरपंच, पर्यावरण विषयक कार्यरत सेवाभावि संस्था, चॅनलचे प्रतिनिधी, व मोठया संख्येने स्थानिक उपस्थित होते यांचे हार्दिक स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची प्रक्रिया सरु केली. समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि १४ सप्टेंबर २००६ च्या अधिनियमान्वये व सुधारीत अधिनियम दि ०१ डिसेंबर २००९ च्या तरतुदीनुसार सदरील लोकजाहीर सुनावणी जनतेच्या माहितीसाठी लोकसुनावणी प्रसिध्दी सुचना दोन वृत्तपत्र जसे मराठी वृत्तपत्र दैनिक सकाळ व इंग्रजी दैनिक वृत्तपत्र हितवाद ३० दिवस आधी दि २४ मार्च २०२४ रोजी देण्यात आली होती. त्यामध्ये प्रस्तावित प्रकल्पाविषयी सुचना,विचार टिका टिप्पणी, आक्षेप, तोंडी तसेच लेखी स्वरुपात नोंदविण्याचे जनतेला व पर्यावरण विषयक काम करणाऱ्या संस्थांना आवाहन करण्यात आलेले होते.

तसेच प्रस्तावित मेसर्स राझा मेटल्स मॅगनीज प्रोसेसिंग अँड ट्रेडींग, भुखंड क्र. बी-६, एम.आय.डी.सी. एरीया, ता. पारशिवनी, जि. नागपुर (१५० मॅट्रिक टन/प्रति महिना मॅगनीज डायऑक्साइड (MnO२) च्या विदयमान उत्पादनव्यतिरीक्त ३५० मेट्रिक टन/प्रति महिना मॅगनीज डायऑक्साईड चे उत्पादन आणि १००० मेट्रिक टन प्रती महिना मॅगनीज ऑक्साइड (MnO) चे उत्पादन करुन सध्याच्या प्रक्रिया उदयोग समूहाचा विस्ताराचा प्रस्ताव ठेवला आहे. त्यामुळे एकुण उत्पादन क्षमता १५०० मेट्रिक टन/प्रति महिना) यांची प्रस्तावित मॅगनीज खनिज गुणवत्ता सुधारणा प्रकल्पाचा विस्तार घेण्याच्या प्रकल्पासंबंधी पर्यावरणीय व्यवस्थापन आराखडाचा मसुदा, कार्यकारी सारांशच्या प्रती जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी स्थानीक मराठी भाषेत व इंग्रजी भाषेत भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि १४ सप्टेंबर २००६ च्या अधिनियमान्वये व सुधारीत अधिनियम दि ०१ डिसेंबर २००९ च्या तरतुदीनुसार अभ्यासण्याकरीता खालील अधिसूचित स्थानिक कार्यालये व ग्रामपंचायती येथे उपलब्ध करण्यात आले आहेत.

१.जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर

२. जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर

३. जिल्हा परिषद, नागपूर

४. उप-विभागीय अधिकारी, पारशिवनी, जि.नागपूर

५. तहसिल कार्यालय, पारशिवनी, ता. पारशिवनी, जि.नागपूर

६. पंचायत समिती, पारशिवनी, ता. पारशिवनी, जि.नागपूर

७. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, ५ वा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर.

८. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.

९. मप्रनि मंडळ (मुख्यालय), सायन सर्कल, सायन (पुर्व), मुंबई-२२.

१०. मुख्याधिकारी, नगर परिषद, पारशिवनी, जि.नागपूर.

११. नगरपंचायत कार्यालय, पारशिवनी, ता. पारशिवनी, जि.नागपूर

१२. ग्रामपंचायत कार्यालय, पालोरा, करंभाळ, डोरली, भागेमाहरी, ता. पारशिवनी, जि.नागपूर

वरील नमुद अधिसुचित शासनाच्या विभागाला देखील त्यांनी त्याच्या स्तरावर सदरहु पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची बाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अश्या प्रकारे जाहीर जनसुनावणी बाबद अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पदधतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्प बाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टिका, टिप्पणी, सुचना व आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोयीचे होईल.

सदरहु जाहिर लोकसुनावणीच्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म. प्र. नि. मंडळ, नागपुर-१ यांना ०१ ईमेल व्दारे सुचना प्राप्त झाली आहे.

सदरील समिती ही फक्त लोकांचे सदरील प्रकल्पाबाबतचे मत नोंदविण्याकरीता असुन कोणालाही निर्णय घेण्याचा अधिकार या समितीस नाही. जनसुनावणीमध्ये उपस्थित मुददयांचा व प्रकल्प धारकांनी दिलेल्या उत्तरास अनुसरुन बैठकिचे इतिवृत्त राज्यस्तरीय आघात मुल्यांकन प्रधिकरण समिती कडे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, मुंबई यांच्या मार्फत सादर करण्यात येईल.

सदरील प्रकल्पाविषयाच्या कोणालाही लेखी निवेदन/सुचना /हरकती घ्यावयाचे असल्यास त्यांनी प्रकल्प धारकांचे सादरीकरण केल्यानंतर आपले नाव, गावाचे नाव सांगुन प्रश्न, सुचना, हरकती, विचारु शकताता या प्रश्न उत्तराच्या कार्यवाहीची नोंद जशीच्या तशी घेऊन या जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त राज्यस्तरीय आघात मुल्यांकन प्राधिकरण समिती कडे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, मुंबई यांच्या मार्फत पाठविण्यात येईल. त्यावर तेथील तज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेतील.

समन्वयक, यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत प्रकल्पा संबंधिची पर्यावरण अनुमतीच्या प्रस्तावाकरीता पर्यावरण विषयक लोकजाहीर सुनावणीची सादरीकरण करण्याची सुचना केली.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पा विषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रमुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या.

**प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती**

- पर्यावरण प्रभाव मुल्यांकन जनसुनावणीचे जाहिरात पत्रक

- पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहिर जनसुनावणीचे प्रयोजन
- प्रस्तावना
- प्रकल्प स्थळ दर्शविणारा नकाशा
- भौगोलिक निर्देशांकासह गूगल प्रतिमेवर प्रकल्पाचे स्थान दर्शविणारा नकाशा
- प्रकल्प स्थळाचे छायाचित्र
- प्रकल्पाचा आराखडा
- क्षेत्रफळाचे वर्गीकरण
- प्रकल्पाचे संक्षिप्त सारांश
- मॅगनिज डायऑक्साईड मे मॅगनिज ऑक्साईड चा प्रक्रिया दर्शवणारा आराखडा
- उत्पादन प्रक्रिया
- उत्पादनाची तपशिलवार माहिती
- स्थानिक पर्यावरणाचा तपशिल व परीसराची माहिती
- प्रकल्पस्थळ निवड गुणवत्ता तालिका
- १० कि. मी त्रिज्येचे अध्ययन क्षेत्र
- सभोवतालचे आधारभूत पर्यावरणविषयक माहिती
- प्रकल्पस्थळापासून १० किमी त्रिज्येच्या अंतरावरील पर्यावरणविषयक माहिती
- अध्ययन क्षेत्रातील जमिनीचे वर्गीकरण
- आधाररेखरुप पर्यावरण
- प्रकल्पस्थळापासून १० किमी त्रिज्येतील परीक्षणाची स्थाने
- वायु पर्यावरण
- अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा
- अध्ययन क्षेत्रातील भुजल पाण्याची गुणवत्ता
- अध्ययन क्षेत्रातील भुपृष्ठावरील पाण्याची गुणवत्ता
- अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता
- अध्ययन क्षेत्रातील ध्वनी तिव्रता
- अध्ययन क्षेत्रातील जैव पर्यावरण
- अध्ययन क्षेत्रातील सामाजीक आर्थीक पर्यावरण
- पर्यावरणावरील परिणामांचा सारांश आणि शमन उपाय योजना
- घनकचरा व्यवस्थापन
- हरीतपपटटयाचा विकास/वृक्षारोपण
- व्यवसायिक निरीक्षण कार्यक्रमाचा तपशिल
- पर्यावरण व्यवस्थापन योजनेवरील खर्चाची तरतुद - (बांधकाम टप्पा)
- पर्यावरण व्यवस्थापन योजनेवरील खर्चाची तरतुद - (परिचालन टप्पा)
- व्यवसायिक पर्यावरण जबाबदारी तपशिल

- प्रकंल्पाची आवश्यकता आणि समर्थन
- पाण्याची आवश्यकता व नियोजन
- पर्यावरण निरीक्षण कक्ष
- प्रकल्पाचे फायदे

उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, नागपुर-१ तथा समन्वयक गठीत लोकसुनावणी समिती यांनी उपस्थित असलेले प्रतिनीधी यांना सदरील पर्यावरण विषयक जनसुनावणीचे उद्दीष्ट पुर्ण होण्याकरीता आपले मत, टिका-टिप्पणी, आक्षेप, सुचना/हरकती मांडण्याबाबत आवाहन केले.

## जनसुनावणी नोंद (प्रोसीडींग) :

| अ. क्रं. | उपस्थितांनी उपस्थित केलेले मुद्दे | प्रकल्प धारकांनी दिलेली प्रतिक्रिया / उत्तर | जनसुनावणी समितीने दिलेली प्रतिक्रिया सुचना |
|---|---|---|---|
| १ | **श्री. किशोर लोखंडे, ग्रामस्थ राहणार पारशिवनी यांनी असा मुददा उपस्थित केला कि** :- या प्रकलपामध्ये झाडांसाठी काय सुविधा करता येणार तसेच Air Pollution, Sound Pollution आणि Water Pollution याच्यासाठी काय तरतुदी केल्या आहेत ? | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले कि या प्रकल्पात एकूण 33 % ग्रीन बेल्ट घेण्याचे ठरविले आहे आणि त्यामध्ये मुख्यतः आम्ही कारखान्यात आणि आजूबाजूच्या परिसरात झाडे लावण्यात येणार आहे. त्याकारिता आम्ही 33 % जागा ठेवली आहे. तसेच आजूबाजूच्या गावात सुद्धा सामाजिक बांधिलकी कार्यक्रमा द्वारे झाडे लावणार आहे. Air Pollution करिता जेव्हा भट्टी सुरु होईल तेव्हा 30 मीटर उंचीची चिमणी आणि Wet Scrubber त्याला Air Pollution Control Device असे म्हणतात ते बसविणार आहोत त्यामुळे Air Pollution होणार नाही. Sound Pollution साठी परिसरामध्ये Green Belt निर्माण करणार आहोत आणि आम्ही त्याची वेळोवेळी देखभाल करणार आहोत किंवा Sound Pollution चे जेजे उपाय अपेक्षित आहे. आणि जे अहवालात सादर केलेले आहेत ते सगळे उपाय करण्यात येतील. त्यामुळे Air | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | Pollution आणि Sound Pollution होणार नाही हे निश्चित केले आहे. व पुढे सांगितले कि Water Pollution करिता सादरीकरण मध्ये सांगितले आहे कि घरघुती सांडपाणी आणि Industry Waste Water वेगवेगळी केले आहे. घरघुती सांडपाणी करिता Septic Tank आणि Soak Pit बसविणार आहोत आणि Industry Waste Water जो कि जिगिंग प्रोसेस मधून निर्माण होतो त्या पाण्याचा Reuse करण्याकरिता Collection Tank बसविण्यात येणार असून ते पाणी परत Roster Kiln मध्ये धातूला थंड करण्याकरिता Reuse करण्यात येईल. म्हणून त्यामुळे पाण्याचे कुठलेही प्रदूषण होणार नाही आणि पाणी परिसराच्या बाहेर जाणार नाही याची दखल घेतली जाईल त्यामुळे Water Pollution अपेक्षित नाही. | |
| २ | **श्री. व्ही. टी. रघुवंशी, ग्रामस्थ राहणार पारशिवनी यांनी असा मुददा उपस्थित केला कि :-** या प्रकल्पामुळे लोकांच्या आरोग्य व तब्येतीवर काय उपाययोजना करणार आहेत ? | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले कि या प्रकल्पामुळे लोकांच्या तब्येतीवर परिणाम नाही होणार आहेत हि तर प्रामुख्याने प्रथम आमची गरज आहे व येथे जे कामगार घेण्यात येईल आधी त्यांच्या आरोग्याची तपासणी केल्या जाईल तसेच वेळोवेळी त्याच्या आरोग्याची तपासणी केल्या जाईल. आणि लोकांच्या आरोग्यावर परिणाम कधी होतो जेव्हा Air Pollution होते पण Air Pollution होऊ नये म्हणून आधीच उपाययोजना केल्या जाईल. त्यामुळे लोकांच्या तब्येतीवर परिणाम होणार नाही. तसेच हा प्रकल्प जेव्हा पूर्ण चालू होणार तेव्हा प्रकल्प धारक त्यांच्या सामाजिक बांधिलकीच्या | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कार्यक्रम उपक्रमाद्वारे आजूबाजूच्या परिसरातील लोकांची आरोग्य तपासणीचे शिबिरे घेते राहील आणि जी त्यांना मदत करता येईल त्यांच्या पद्धतीने ते सुद्धा त्यांनीं प्रस्तावित केले आहे. | |
| ३ | **श्री. सागर सायरे, ग्रामस्थ राहणार पारशिवनी यांनी असा मुददा उपस्थित केला कि, :-** आपण जी झाडे लावण्याची गोष्ट केली आहे हा प्रकल्प कोणत्या वर्षी पासून सुरु आहे आणि ह्या प्रकल्पाच्या सभोवताल किती झाडे लावली आहे. आणि आपण या प्रकल्पात किती हरित क्रांती केली आहे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले कि हा प्रकल्प मागील २ वर्षापासुन चालु आहे. आणि हा एकदम लघु उद्योग आहे. आणि प्रकल्प धारकांना हे बंधनकारक आहे कि Open Space च्या ३३ % Green Belt निर्माण करणे गरजेचे आहे आणि त्यांनी प्रकल्पाची एकूण ३३ % जागा Green Belt करीता राखून ठेवली आहे. त्याप्रमाणे आजही या जागेवर त्यांनी जी झाडे लावलेली आहेत आणि हा त्यांचा लघु उद्योग आहे नंतर उद्योग पुढे चालू झाल्यावर ते भविष्यात प्रकल्पा मध्ये तसेच आजूबाजूच्या क्षेत्रात सुद्धा Green Belt लावतील. तशी त्या अहवाला मध्ये खात्री दिली आहे. आणि Green Belt Development करण्यासाठी लागणार फंड उपलब्ध करून देण्याची अहवाला मध्ये तरतूद केली आहे. | |
| ४ | **श्री. दुधराम मुळे, ग्रामस्थ राहणार पारशिवनी यांनी असा मुददा उपस्थित केला कि, :-** इथे जे लोक काम करणार आहेत त्यांना आपण काय सुविधा देणार आहेत. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले कि हा लघु उदयोग आहे. प्रास्ताविक प्रकल्पा मध्ये नेमणूक करण्या आधी त्यांची आरोग्य तपासणी करण्यात येईल व त्यांचा जो मोबदला आहे तो प्रकल्पधारकारी ठरवून दिला आहे तो त्यांना वेळोवेळी मिळेलच. व त्याव्यतिरिक्त त्याच्या आरोग्यवर काही परिणाम होऊ नये म्हणून त्यांच्या आरोग्य तपासण्या व त्यांचे | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | इन्शुररन्स अश्या पद्धतीची व्यवस्था केलेली आहे व सामाजिक बांधिलकीच्या कार्यक्रम मध्ये त्यांची वेगळी व्यवस्था व वेगळा फंड केलेला आहे. | |
| ५ | **श्री. रमाकांत वाघढरे, ग्रामस्थ पालोरा यांनी असा मुददा उपस्थित केला की,** :- येथे जे चिमणी लागेल त्याचामुळे शेतीवर, शेतीच्या पिकावर किंवा पाण्यावर काही परिणाम होऊ शकतो का ? | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले कि चिमणी जी लागणार आहे त्याच्यामुळे काही परिणाम होईल का तर CPCB च्या नियमाप्रमाणे उद्योगात चिमणीची उंची हि ३० मीटर प्रस्तावित केलेली आहे त्याव्यतिरिक्त Air Pollution रोखण्याकरिता Wet Scrubber हि अत्याधुनिक सुविधा जी मार्केट मध्ये उपलब्ध आहे ते उपकरण सुविधा बसविण्यात येणार आहे त्यामुळे Air Pollution होणार नाही आणि हा प्रकल्प ZLD आहे आणि या प्रकल्पातून निघणारे कुठलेही पाणी कोणत्याही तलाव मध्ये किंवा नदी मध्ये सोडले जाणार नाही व जमिनीवर पण सोडले जाणार नाही. ज्यामुळे भूजल किंवा भूपृष्ठजल यांचे प्रदूषण होणार नाही याची योग्य ती निगाह राखली जाईल. | |
| ६ | **श्री. राकेश गोमकाडे, ग्रामस्थ तामसवाडी यांनी असा मुददा उपस्थित केला की,** :- हि जी जागा आहे या व्यतीरीक्त जागा घेणार आहेत का ? | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले कि हा प्रकल्प सध्या स्तिथीत MIDC Land मध्ये आहे आणि त्यामध्ये नवीन प्रकल्पात जिगिंग प्रोसेस आहे आणि त्याव्यतिरिक्त अतिरिक्त दोन भट्ट्या लावणार आहेत त्यासाठी त्यांना नवीन जागेची गरज नाही. नवीन जागेत $MnO_2$ चे रूपांतर Mno मध्ये करणार आहे तर त्यासाठी कुठलीही नवीन जागेची गरज नाही. | |
| ७ | **श्री. दामोदर, ग्रामस्थ राहणार पारशिवनी यांनी असा मुददा उपस्थित केला कि,** :- माझे दोन प्रश्न आहेत | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले कि जस आपण विचारलं कि पहिल्यांदा तर पर्यावरणाची अनुमती आहे | माननीय अध्यक्ष, लोकसुनावणी समिती तथा अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, यांनी |

| | | | |
|---|---|---|---|
| | माझा पहिला प्रश्न असा आहे कि आपल्या परिसरात एक वृक्षारोपणाचा कार्यक्रम करणार आहेत त्यामध्ये स्थानिक ग्रामपंचायतीला विश्वासात घेऊन लगतच्या परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम करू शकतो का ? माझा दुसरा प्रश्न असा आहे कि या प्रकल्पामुळे जे Sound Pollution निर्माण होणार आहे त्याचा किती Range मध्ये Sound Distrubute होईल व त्याचे काही विपरीत परिणाम वृद्ध लोकांमध्ये किंवा बालकांवर होऊ शकतात का ? | वनमंत्रालयानुसार आपल्याला प्रकल्प क्षेत्रातच ३३ % Green Belt बनविणे किंवा संवर्धन करणे गरजेचे आहे तर ३३ % जागा हि प्रकल्पाकडन बंधनकारकच आहे त्याव्यतिरिक्त सामाजिक उपकरणाद्वारे ते ग्रामपंचायती मध्ये किंवा शाळा मध्ये आजूबाजूच्या रोड लगत त्याच्या सामाजिक बांधिलकीच्या उपक्रम द्वारे झाडे ते तिथे पण लावू शकतात आणि हे झाडे लावतांना त्यांना जी स्थानिक झाडे जे असतात ती झाडे लवकर वाढतात ती झाडे लावणे अपेक्षित आहे हि मार्गदर्शक तत्वे CPCB आणि MOEFCC आणि वन मंत्रालय यांनीच दिलेली आहे तसेच तुम्ही दुसरा प्रश्न जो विचारला कि हो ते ग्रामपंचायतीला विचारतील कि आम्हाला इथे झाडे लावायची आहे काय खर्च येणार आहे त्यासाठी ते तुम्हाला ग्रामपंचायतीतला फंड देतील किंवा स्वखर्चाने सुद्धा ते झाडे त्या ठिकाणी लावतील दुसरं म्हणजे आजूबाजूच्या लोकांना Sound Pollution मुळे त्रास होणाऱ्या खूप मोट्या काही ऍक्टिव्हिटी नाही फक्त जिगिंग आणि वाहनांची ये जा यामुळेच Sound Pollution होऊ शकतो तसेच हा प्रकल्प MIDC मध्ये असल्यामुळे आजूबाजूच्या परिसरात Sound Pollution चा परिणाम होणार नाही | उपस्थितांना आव्हान केले कि ज्या कोणाला या प्रकल्पाविषयी काही प्रश्न , सूचना, हरकती आणि लेखी निवेदन दयाचे असेल तर देऊ शकता आणि जर पुढचे प्रश्न , सूचना, हरकती नसतील तर आपण थांबूया. |

मा. अध्यक्ष तथा अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, पर्यावरण लोकसुनावणी समिती यांनी समारोप प्रसंगी आपल्या अभिप्रायात असे नमुद केले की, लोकसुनावणीच्या वेळी उपस्थित केलेले सर्व मुद्दे जसेच्या तसे लोकसुनावनीच्या इतीवृत्तांतामध्ये समाविष्ट करून पुढील योग्य त्या कार्यवाही करीता सदरचा अहवाल पर्यावरण मंत्रालय, महाराष्ट्र शासन हयांना सादर करण्यात येईल.

त्यांनतर आभार प्रदर्शन होऊन लोकसुनावणी पुर्ण झाल्याचे घोषित केले.

| | |
|---|---|
| **(संजय डी. पाटील)** | **(रा. ड. पाटील)** |
| सदस्य लोकसुनावणी समिती | समन्वयक लोकसुनावणी समिती |
| तथा प्रादेशिक अधिकारी, | तथा उप प्रादेशिक अधिकारी, |
| म. प्र.नि. मंडळ, नागपुर | म. प्र.नि. मंडळ, नागपुर -१ |

**(प्रिय्रेश महाजन)**
अध्यक्ष, लोकसुनावणी समिती
तथा अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, नागपुर.